आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.५० वाजता

१ फेब्रुवारी २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांना प्राधान्य देणारा, सर्वांचा विकास साधणारा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून सादर

- नवीन आयकर रचनेतून अर्थमंत्र्यांची मध्यमवर्गाला मोठी खूषखबर, १२ लाखापर्यंतचं उत्पन्न पूर्णपणे करमुक्त, त्यापुढील उत्पन्नावरच्या करांच्या दरातही कपात

- आकांक्षित जिल्ह्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा, डाळींच्या उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतंत्र मिशन

- कर्करोगावरची औषधं, दुचाकी, पादत्राणे, कृत्रिम दागिन्यांना करसवलती मिळाल्यानं स्वस्त होणार

**आणि**

- सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावरच्या उपचारांसाठी सुविधा निर्माण करणार

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज लोकसभेत सादर केला. या माध्यमातून येत्या ५ वर्षात सर्वांचा विकास करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यात गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांना प्राधान्य दिलं जाणार आहे. आर्थिक वृद्धीला चालना, सर्वंकष विकास, खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन, सर्वसामान्यांच्या आकांक्षांना उभारी देणारा आणि मध्यमवर्गाला आणखी बळकट करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. हा अर्थसंकल्प कर निर्धारण, ऊर्जा, शहरी विकास, खाणकाम, वित्त आणि नियामकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणणारा आहे, असंही त्या म्हणाल्या. मात्र अर्थसंकल्प सादरीकरण सुरू झाल्यावर कुंभमेळ्यातल्या दुर्घटनेच्या मुद्द्यांवरुन विरोधकांनी लाक्षणिक सभात्याग केला होता.

**<><><><><>**

पुढच्या आठवड्यात नवीन आयकर विधेयक आणण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. टॅक्स रिबेटच्या सोयीमुळं १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना नवीन कर रचनेनुसार कुठलाही आयकर द्यावा लागणार नाही, अशी मध्यमवर्गासाठी खूषखबर त्यांनी आजच्या भाषणात दिली. नोकरदारांना ७५ हजार रुपयांचं standard deduction मिळत असल्यानं त्यांना पावणे १३ लाख रुपयांच्या उत्पन्नावर काहीही आयकर द्यावा लागणार नाही.

नवीन कर रचनेत असलेल्या करांच्या दरांमध्येही सुधारणा त्यांनी आज जाहीर केल्या. त्यानुसार आता ४ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना कुठलाही कर द्यावा लागणार नाही, यापूर्वी ही मर्यादा ३ लाख रुपये होती. त्यापुढील उत्पन्नावर असलेल्या करांच्या दरांमध्येही त्यांनी मोठी सवलत दिली आहे. त्यामुळे नवीन कर रचना मोठ्या प्रमाणात आकर्षक झाली आहे. पूर्वी नवीन कर रचनेत १५ लाखांच्या वर असलेल्या उत्पन्नावर ३० टक्के दराने कर द्यावा लागत होता आणि २४ लाखाच्या वर असलेल्या उत्पन्नावर ३० टक्के दराने कर द्यावा लागेल. नवीन कर रचनेअंतर्गत

४ ते ८ लाख रुपयांदरम्यानच्या उत्पन्नासाठी ५ टक्के,

८ ते १२ लाख रुपयांदरम्यानच्या उत्पन्नासाठी १० टक्के दराने आयकर द्यावा लागेल.

१२ ते १६ लाख रुपयांच्या दरम्यान असलेल्या उत्पन्नासाठी १५ टक्के,

१६ ते २० लाखांसाठी २० टक्के आणि २० ते २४ लाखासाठी २५ टक्के दराने आयकर द्यावा लागेल.

यामुळं १२ लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा ८० हजार रुपये आयकर वाचेल. १८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा ७० हजार आणि २५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा १ लाख १० हजार रुपये आयकर वाचेल. याशिवाय TDS आणि TCS साठीही त्यांनी अनेक सुधारणा जाहीर केल्या. सुधारित आयकर विवरण पत्र भरण्याची मुदत आता २ वर्षांवरुन ४

वर्ष केली आहे. याशिवाय क्रिप्टो चलनाच्या माध्यमातून असलेली मालमत्ताही जाहीर करावी लागणार आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या शंभर आकांक्षित जिल्ह्यांमध्ये राज्यांच्या सहकार्याने **प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना** राबवणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडताना लोकसभेत सांगितलं. उत्पादन वाढवणं, शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करणं, पंचायत आणि गट स्तरावर साठवणुकीची क्षमता वाढवणं, सिंचन सुविधा सुधारणं, दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्ज उपलब्ध करून देणं हे याचं उद्दिष्ट आहे. याचा लाभ दीड कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना होणार आहे. किसान क्रेडिट कार्डद्वारे साडे सात कोटींपेक्षा जास्त शेतकरी, मच्छिमार आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना अल्प मुदतीचं कर्ज उपलब्ध करून दिलं जाणार आहे. सुधारित व्याज अनुदान योजने अंतर्गत कर्ज मर्यादा तीन लाखांहून ५ लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**ग्रामीण समृद्धी** आणि लवचिकता कार्यक्रम राबवला जाणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. याद्वारे कृषी क्षेत्रातल्या बेरोजगारांना कौशल्य, तंत्रज्ञान पुरवलं जाईल. याचा फायदा महिला, तरुण शेतकरी, ग्रामीण युवक, अल्पभुधारक यांना होणार आहे.

तेलबियांसाठी राष्ट्रीय अभियान राबवणार आहे. तूर, उडीद, मसूर यांना केंद्रस्थानी ठेवून ६ वर्षांचा आत्मनिर्भर कार्यक्रम आखला जाईल, असं

अर्थमंत्र्यांनी सांगितलं. **कापसा**चे उत्पादन वाढवण्यासाठीही विशेष कार्यक्रम आखला जाईल, असं सीतारामन यांनी सांगितलं. याद्वारे कापसाचं उत्पादन वाढेल, तसंच लांब तंतूच्या कापसाच्या प्रकाराला प्रोत्साहन मिळेल.

**जलजीवन** मिशन अंतर्गत शंभर टक्के घरांना नळजोडणी करण्यासाठी याची मुदत २०२८ पर्यंत वाढवल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एक कोटी असंघटित कामगारांची ई श्रम पोर्टलवर नोंदणी केली जाईल, तसंच ओळखपत्र दिलं जाईल, असं निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सांगितलं. त्यांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सुविधा पुरवल्या जातील. बँकांकडून वाढीव कर्ज, ३० हजार रुपयांची मर्यादा असलेली यूपीआयशी संलग्न क्रेडिट कार्ड आणि प्रधानमंत्री स्वनिधी योजनेत वाढ केली जाईल, अशी घोषणा अर्थमंत्री सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात केली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग क्षेत्रातल्या वर्गीकरणासाठी गुंतवणुकीची मर्यादा अडीच पटीने वाढवण्यात आली आहे. तसंच, या क्षेत्रांमधल्या उलाढालीची मर्यादाही दुप्पट करण्यात आली आहे. सूक्ष्म उद्योगांसाठी सध्याची मर्यादा १ कोटी असून ती आता अडीच कोटी

इतकी होईल. तर लघु उद्योगाची मर्यादा १० कोटीपासून वाढवून २५ कोटी आणि मध्यम उद्योगांमधल्या गुंतवणुकीची मर्यादा ५० कोटींहून वाढवून १२५ कोटी केली आहे.

या उद्योगांच्या वर्गीकरणासाठी उलाढालीच्या मर्यादेतही दुपटीने वाढ करण्यात आली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी आधी असलेली मर्यादा अनुक्रमे ५, ५० आणि २५० कोटी इतकी होती. ती वाढवून आता १० कोटी, १ अब्ज आणि ५ अब्ज इतकी करण्यात आली आहे. उद्योग पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म उद्योगांसाठी पाच लाख रुपये मर्यादेचं क्रेडिट कार्डही देण्यात येणार आहे.

याशिवाय चर्म उद्योग, खेळणी, अन्नप्रक्रिया, पर्यावरण पूरक तंत्रज्ञान निर्मिती अशा विविध क्षेत्रांसाठीही संस्थांची स्थापना आणि योजनांवर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.

**<><><><><>**

अर्थमंत्र्यांनी आजच्या अर्थसंकल्पात कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर आजारांवरच्या ३६ औषधांना आयात शुल्कातून पूर्ण माफी दिली आहे. याशिवाय ६ जीवनरक्षक औषधांवरचं ५ टक्के सवलतीच्या दरातून आयात शुल्क द्यावे लागेल. याशिवाय सुरीमी, कॅमेरा तसंच हेडफोनचे सुटे भाग, PCB चे भाग, मोबाइलचे सेन्सर, LED आणि LCD चे भाग, दुचाकी यांच्यावरही आयात शुल्कात सवलत दिल्यानं या वस्तू स्वस्त होतील.

मार्बल, ग्रॅनाइट, पादत्राणे, PVC बॅनर, सौर बॅटरी, लोह आणि स्टीलच्या काही वस्तू, स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर, कृत्रिम दागिने, दुचाकी वाहने यासारख्या वस्तूंवरच्या शुल्कातही कपात झाल्यानं या वस्तू स्वस्त होतील.

<><><><><>

पुढच्या वर्षी वैद्यकीय महाविद्यालयात दहा हजार जागा वाढवण्यात येतील तसंच पुढच्या पाच वर्षांत ७५ हजार जागा वाढतील असं सीतारामन यांनी सांगितलं. तसंच येत्या तीन वर्षांत प्रत्येक जिल्हा रुग्णालयात कर्करुग्णांसाठी डेकेअर सेंटर उभारले जातील, यातले २०० सेंटर २०२५-२६ या आर्थिक वर्षातच उभारले जातील असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० सारख्या उपक्रमांसाठी या अर्थसंकल्पात खर्च वाढवण्यात आल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. या उपक्रमाचा लाभ ८ कोटी बालकं, एक कोटी गरोदर आणि स्तनदा मातांना होतो, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशातल्या ५० पर्यटन स्थळांचा विकास राज्यांच्या सहकार्याने केला जाईल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. राज्यांना त्यांच्या

कामगिरीवर आधारित प्रोत्साहनपर मदत दिली जाईल, असंही अर्थमंत्र्यांनी सांगितलं. होम स्टे साठी मुद्रा लोन दिलं जाईल, भगवान बुद्धांच्या आयुष्याशी संबंधित स्थळांवर विशेष लक्ष केंद्रित केलं जाईल, वैद्यकीय पर्यटन आणि उपचाराला प्रोत्साहन दिलं जाईल, असंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

केंद्रीय अर्थसंकल्प हा मध्यमवर्गीयांसाठी ‘ड्रीम बजेट’ असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारांकडून या अर्थसंकल्पाला संमिश्र प्रतिक्रिया मिळाली आहे. व्यवहार सुरू झाले तेव्हा तेजीत असलेले सेन्सेक्स आणि निफ्टी अर्थसंकल्प सुरू होऊन सुमारे पाऊण तास झाल्यावर जोरदार कोसळले. मात्र आयकर सवलतींच्या घोषणांमुळे त्याला उभारी मिळाली. सध्या दोन्ही निर्देशांकात तेजीसह व्यवहार सुरू आहेत.

//<><><><><>//